|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन दि. १९ व २० डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. या संशोधन स्पर्धेत ३६२ प्रवेशिकेद्वारे ५६२ विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

या महिन्यात जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा घेण्यात आली. त्यामधील विजेत्यांचा विद्यापीठस्तरीय संशोधन स्पर्धेत सहभाग राहणार आहे. पदवी, पदव्युत्तर आणि संशोधक या तीन गटांमध्ये ही स्पर्धा होणार असून त्यामध्ये १) कृषी व पशुसंवर्धन २) वाणिज्य, व्यवस्थापन व विधी ३) अभियांत्रिकी व तंत्रज्ञान ४) मानव्य विज्ञान, भाषा व ललितकला ५) वैद्यकीय व औषधीनिर्माण शास्त्र ६) विज्ञान या विषयातील मोड्युल व पोस्टर्स द्वारे विद्यार्थी आपले संशोधन सादर करणार आहे. ३६२ पैकी ३३१ पोस्टर्स व ३१ मोडयूल यांचा सहभाग आहे. गुरूवार दि. १९ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयआयएसईआरचे प्रा. अरविंद नातु यांच्या हस्ते उद्‌घाटन होणार असून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी हे अध्यक्ष राहतील. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बुऱ्हाणपुर येथील आनंद एज्युकेशनल टेक्नीकल ॲण्ड व्होकेशनलचे संस्थापक श्री. आनंद चोकसी  हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे व व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांची उपस्थिती राहणार94 आहे.

शुक्रवार दि. २० डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिक वितरण समारंभ होईल. यावेळी आयआयएसईआरचे प्रा. श्रीनिवास होथा व केशवस्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भरत अमळकर हे प्रमुख अतिथी राहतील. व्य. प. सदस्य राजेंद्र नन्नवरे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांची उपस्थिती असेल अशी माहिती समन्वयक प्रा. एच.एल. तिडके यांनी दिली.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १८ डिसेंबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी